मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 7 जुलै 2024 | पान- 1

# पहिल्या तिमाहीमध्ये तब्बल 432 कोटींचा कर जमा

## 54 टक्के मालमत्ताधारकांनी घेतला सवलतींचा लाभ : आयुक्तांकडून जागरूक करदात्यांचे आभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाअंतर्गत बोगस मोटर ड्रायव्हिंग स्कूल आणि एजंटांवर कारवाई करणार असून, कार्यालयातील शिस्त राखली जाईल, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण यांनी दिली. त्याचप्रमाणे परिवहन कार्यालयाअंतर्गत भेडसावणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्यात येणार आहे. हा बदल येत्या काही काळातच होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वाहन परवाने व इतर कामे अधिकाधिक सुलभ होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.




पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याचा दर्जा वाढवून प्रादेशिक परिवहन अधिकारी करण्यात आले. त्यानंतर प्रथमच प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणून संदेश चव्हाण यांची नियुक्ती झाली आहे. त्यांच्यावर मुंबई येथील परिवहन विभागातील संगणकीकरणाचाही पदभार आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी या ठिकाणी अपेक्षित बदल करणार असल्याचे स्पष्ट केले. आरटीओ संबंधित नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या आणि कार्यालयाची शिस्त याबाबत नुकतीच अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.

वाहन संबंधित परवाने आणि इतर कामे करण्यासाठी आरटीओमध्ये नागरिक येत असतात. मात्र अनेकदा ते एजंट अथवा मोटर ड्रायव्हिंग स्कूल चालकांकडे जातात. दरम्यान, काही बोगस एजंट अथवा मोटर ड्रायव्हिंग स्कूल चालकांकडून नागरिकांची फसवणूक होऊ शकते. तसेच, पैसे भरून सुद्धा नागरिकांना आरटीओचे हेलपाटे मारावे लागतात. त्यामुळे अशा काही एजंटांवर कारवाई करण्यात येणार आहे. याबाबत आढावा घेण्यात येणार असून, नागरिकांच्या तक्रारी अनुषंगाने आणि आरटीओत फिरणाऱ्या बोगस एजंटांवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून बडगा उचलण्यात येईल. प्रत्यक्षात वाहन परवाने तसेच इतरही कामे नागरिकांना ऑनलाइन उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे नागरिकांनी आरटीओत येण्याची गरज नाही.

### आरटीओतील पार्किंगचा प्रश्न मिटणार

» पिंपरी-चिंचवड आरटीओ येथील नागरिकांना पुरेशी पार्किंग व्यवस्था नसल्याने वाहने रस्त्यावरती लावण्यात येतात. त्यामुळे आरटीओ कार्यालयालगत वाहनांच्या मोठ्या रांगा लागलेल्या असतात. दरम्यान, मानव विरहित ब्रेक टेस्ट सिस्टीम बसवण्यात येणार असून, त्याचे काम सुरू आहे. ते झाल्यानंतर आरटीओमागील सध्या सुरू असलेल्या ब्रेक टेस्ट ट्रॅकच्या जागेवर पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार आहे.

### लर्निंग लायसन्सचा कोटा वाढवला

वाहनचालकांना लर्निंग लायसन्ससाठी थांबावे लागत होते. त्याचप्रमाणे वेळेत अपॉइंटमेंटदेखील मिळत नाही. त्यामुळे आरटीओकडून लर्निंग (शिकाऊ) लायसन्स कोटा वाढवण्यात आला आहे. त्यापूर्वी हा कोटा सव्वा दोनशेच्या आसपास होता. तो आता जवळपास २८५ करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे परीक्षार्थींचा कोठाही वाढवण्यात आला आहे.

# इंद्रायणी प्रदूषित करणाऱ्यांवर होणार कारवाई

## आळंदीत झालेल्या बैठकीत पोलीस प्रशासनाचे आश्वासन : कष्टकरी जनता आघाडीचे प्रमुख बाबा कांबळे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदी प्रदूषित करणाऱ्या व परिसरात अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे आश्वासन आळंदी पोलिसांच्या वतीने देण्यात आले. या प्रश्नावर संबंधित पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत आळंदी पोलीस ठाण्यात बैठक झाली. त्याबाबत पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रश्नावर सकारात्मक चर्चा केली. पोलिसांच्या या कारवाईमुळे आळंदीतील स्थानिक ग्रामस्थ, वारकरी आणि लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कष्टकरी जनता आघाडीचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी सांगितले की, इंद्रायणी नदी प्रदूषण रोखण्यात यावेत. तसेच संतभूमी आळंदी येथील गैरप्रकार रोखण्यात यावेत. कष्टकरी कामगार पंचायत व इतर विविध संघटनांच्या वतीने ही मागणी करण्यात आली. त्याकडे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन पुकारण्यात आले होते. याबाबत पोलीस आयुक्तांनी गंभीर दखल घेऊन या प्रकरणी आळंदी पोलिसांना आदेश दिले. या



प्रकरणी तातडीने कारवाई करण्यास सांगितले. त्यानंतर आळंदी पोलीस स्टेशन येथे बैठकीचे आयोजिन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. संबंधितांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. या प्रश्नांची व विविध मागण्यांची दखल घेतल्यामुळे व पुढील आश्वासन दिल्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे बाबा कांबळे यांनी सांगितले. पोलिसांच्या या सकारात्मक आणि कारवाईच्या आश्वासनामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# गर्भवतींच्या तपासणीवर महापालिकेचा भर

## पुणे शहरात झिकाचे सहा रुग्ण : झिका संसर्गाच्या पार्श्वभूमीवर 41 जणींचे नमुने एनआयव्हीला पाठवले

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात झिकाचे सहा रुग्ण आतापर्यंत आढळून आले आहे. झिकाचा सर्वाधिक धोका गर्भवतींना असल्याने महापालिकेने त्यांच्या तपासणीवर भर दिला आहे. एरंडवणे, मुंढवा आणि डहाणूकर कॉलनी परिसरात झिकाचे रुग्ण आढळून आले असून या परिसरातील ४१ गर्भवतींचे रक्त नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेकडे (एनआयव्ही) पाठविण्यात आले आहेत.

झिका विषाणूचा धोका हा गर्भवती आणि तिच्या गर्भाला असतो. यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाने झिका विषाणूचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरातील गर्भवतींची तपासणी सुरू केली आहे. एरंडवणे परिसरात एकूण ७२ गर्भवती असून, त्यातील १४ गर्भवतींचे नमुने तपासणीसाठी एनआयव्हीला पाठविण्यात आले आहेत. याचबरोबर मुंढवा परिसरातील ६० पैकी १८ गर्भवतींचे नमुने आणि डहाणूकर कॉलनी परिसरातील ३५१ पैकी ९ गर्भवतींचे नमुने तपासणीसाठी आरोग्य विभागाने एनआयव्हीकडे पाठविले आहेत.



आरोग्य विभागाने गर्भवतींसह एकूण ६४ जणांचे नमुने तपासणीसाठी एनआयव्हीला पाठविले. त्यातील सुमारे २५ जणांचे तपासणी अहवाल आरोग्य विभागाला मिळाले आहेत. त्यामुळे अद्याप सुमारे ४० जणांचे तपासणी अहवाल प्रतीक्षेत आहेत. एनआयव्हीमध्ये संपूर्ण देशभरात रक्तनमुने तपासणीसाठी येतात. त्यामुळे तपासणी अहवाल मिळण्यास विलंब होत आहे, अशी माहिती आरोग्य विभागातील सूत्रांनी दिली.

महाराष्ट्रात झिका विषाणूची प्रकरणे आढळल्यानंतर, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने बुधवारी सर्व राज्यांना एक सल्लागार जारी केला. आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्यांना गर्भवती महिलांची संसर्गासाठी तपासणी करून आणि झिका पॉझिटिव्ह आढळणाऱ्या गर्भवती मातांच्या गर्भाच्या वाढीवर लक्ष ठेवून सतत देखरेख ठेवण्यास सांगितले आहे. 2 जुलैपर्यंत पुणे, महाराष्ट्रामध्ये झिका विषाणूचे सहा रुग्ण आढळले आहेत.

केंद्राने जारी केलेल्या सल्लागारात राज्यांना झिका विषाणूच्या संसर्गासाठी गर्भवती महिलांची तपासणी आणि झिका पॉझिटिव्ह आढळणाऱ्या गर्भवती मातांच्या गर्भाच्या वाढीवर लक्ष ठेवून सतत देखरेख ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सल्ल्यानुसार, राज्ये कीटकशास्त्रीय देखरेख मजबूत करतील आणि निवासी क्षेत्रे, कामाची ठिकाणे, शाळा, बांधकाम साइट्स, संस्था आणि आरोग्य सुविधांमध्ये वेक्टर नियंत्रण क्रियाकलाप तीव्र करतील. तथापि, सरकारने देखील या विषाणूबद्दल घाबरू नका, असा सल्ला दिला आहे.

### 66 हजारांचा दंड वसूल

**» पावसाळा सुरू होताच कीटकजन्य आजारांचा प्रादूर्भाव वाढू लागला आहे. यामुळे महापालिकेने या आजारांना प्रतिबंध करण्यासाठी पावले उचलली आहेत. आरोग्य विभागाकडून शहरात सर्वेक्षण सुरू आहे. यात २४६ घरांमध्ये डासांच्या अळ्या आढळून आल्या. या प्रकरणी ८२ जणांना नोटीस बजावून, त्यांच्याकडून ६६ हजार ८०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी दिली.**

# येरवडा कारागृहात लवकरच बायोमेट्रिक!

## कैद्यांना एका बराकीतून दुसऱ्या बराकीत प्रवेश करणे होणार अशक्य : मारामाऱ्यांना बसणार आळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

येरवडा मध्यवर्ती कारागृहातील सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करण्यासह कैद्यांच्या हाणामारीच्या घटना आता रोखल्या जाणार आहेत. येरवडा कारागृहात प्रायोगिक तत्त्वावर प्रत्येक बराक आणि सर्कलसाठी 'बायोमेट्रिक गेट सिस्टीम' बसविण्यात येणार आहे. त्यामुळे कैद्याला एका बराकीतून दुसऱ्या बराकीत प्रवेश करता येणे अशक्य होणार आहे. अशी यंत्रणा असणारे हे राज्यातील पहिलेच कारागृह ठरणार आहे.

येरवडा मध्यवर्ती कारागृहात तीस बराकींमध्ये २,३२३ कैदी क्षमता आहे. मात्र, या ठिकाणी कैद्यांची संख्या ७ हजार पर्यंत पोहोचली आहे. येरवडा कारागृह राज्यातील सर्वाधिक कैदी संख्या असलेले कारागृह आहे.



येरवडा कारागृह अतिशय सुरक्षित असल्याचे समजले जाते. कारागृहात पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, पुणे जिल्हा नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रासह नगर जिल्ह्यातील कैदीसुद्धा ठेवले जातात. त्यामुळे येथे कैदी दाटीवाटीने राहात असल्याचे वास्तव आहे. एका बाजूला एवढी मोठी कैदी संख्या असल्यामुळे कारागृह प्रशासनाला या कैद्यांवर नियंत्रण ठेवणे अशक्य होते. कैद्यांमध्ये अनेकदा मारामारी होते. यामध्ये एखाद्या कैद्याचा मृत्यूसुद्धा होतो. त्यासाठी कारागृह प्रशासनाने बायोमेट्रिक गेट सिस्टीम बसविण्याचा निर्णय घेतला आहे.

येरवडा मध्यवर्ती कारागृहाची एकूण कैदी क्षमता २,३२३ आहे. मात्र, कारागृहात तिपटीपेक्षा अधिक कैदी म्हणजे ७ हजारांपर्यंत कैदी आहेत. कारागृहातील सर्कल एक, तीन आणि टिळक यार्डात प्रत्येकी आठ बराक, सर्कल दोनमध्ये सहा बराक तर किशोर विभागात तीन बराक आहेत. यासह अंडासेल, फाशीची शिक्षा सुनावलेले कैदी, रुग्णकैदी, ज्येष्ठ नागरिक कैदी, विदेशी कैदी अशा विविध बराकींमध्ये कैदी ठेवले आहेत. यातील जवळपास सत्तर टक्के कच्चे कैदी आहेत. त्यामुळे कच्च्या कैद्यांची संख्या विचारात घेता येरवडा कारागृहात कैद्यांची नेहमी मारामारी होत असते.

येरवडा मध्यवर्ती कारागृहात ४५ बराक, १३६ विभक्त कोठडी आणि १४ अतिसुरक्षा विभाग (अंडा सेल) आहेत. कारागृहात कैद्यांना विविध बराक आणि सर्कलमध्ये ठेवले जाते. जुनी भांडणे, सूड आणि वर्चस्वाच्या कारणावरून एका सर्कल किंवा बराकीत शिक्षा भोगणारे कैदी दुसऱ्या बराकीत जाऊन मारहाण करून जिवे मारण्याचा प्रयत्न करतात. या घटना टाळण्यासाठी प्रशासनाने कारागृहात प्रत्येक बराक, सर्कल आणि विभक्त कोठडीत बायोमेट्रिक गेट सिस्टीम बसविण्याचे काम युद्ध पातळीवर हाती घेतले आहे.

### कारागृहात पॅनिक अलार्म बटण

**» एखाद्या बराक किंवा सर्कलमध्ये कैद्यांची हाणामारी किवा काही अनुचित घटना घडल्यास त्याची प्रशासनाला तत्काळ माहिती मिळावी, यासाठी पॅनिक अलार्म बटण बसविण्यात येत आहे. त्यामुळे मोठी अनुचित घटना वेळीच रोखता येणार आहे. याशिवाय कारागृहातील प्रत्येक कैद्याला प्रशासनाची सूचना एकाच वेळी ऐकू येण्यासाठी बराकमध्ये मध्यवर्ती ध्वनिवर्धक यंत्रणा लावण्यात येणार आहे.**

# पिंपरीतील 88 मालमत्तांचा लिलाव

## वारंवार आवाहन करूनही कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांच्या 88 मालमत्ता महापालिकेने जप्त केल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

वारंवार आवाहन करूनही कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांच्या ८८ मालमत्ता महापालिकेने जप्त केल्या आहेत. या मालमत्तांचा ५ ऑगस्ट रोजी लिलाव होणार आहे. त्यात सहभागी होण्यासाठी इच्छुकांना २ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहेत. यामध्ये पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, सराफी व्यापाऱ्यांच्या बिगरनिवासीसह निवासी मालमत्तांचा समावेश आहे.

महापालिकेला बांधकाम परवानगीतून मिळणाऱ्या उत्पन्नात घट झाली आहे. त्यामुळे करसंकलन विभाग हा उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. मागील पाच वर्षांपासून कोणतीही करवाढ न करता थकीत करवसुलीवर भर दिला. विनानोंद मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्यांना करकक्षेत आणले. परिणामी, उत्पन्नात भर पडली. आता जप्त केलेल्या मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



### 50 हजारांपासून तीन लाख रुपयांपर्यंत कर थकबाकी

» महापालिकेचा कर वर्षानुवर्षे थकीत असलेल्या मालमत्ताधारकांना गेल्या वर्षी नोटीस बजावली होती. तरीही प्रतिसाद न दिल्याने ८८ मालमत्ता जप्त केल्या गेल्या. त्यांचा लिलाव केला जाणार आहे. ५० हजारांपासून तीन लाख रुपयांपर्यंत कर थकबाकी असलेल्या या मालमत्ता आहेत. त्यांचे बाजारमूल्य किमान १९ लाखांपासून दीड कोटी रुपयांपर्यंत आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' मधील प्रकरण आठ (कराधान) नियम ४२ ते ४७ मधील तरतुदींनुसार मालमत्तांची जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे

लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी महापालिकेचा करसंकलन विभाग, मुख्य कार्यालयात २ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत आधार कार्ड, पॅन कार्ड यांच्या प्रतींसह लेखी अर्जाद्वारे नोंदणी करावी. लिलावातील मालमत्तांबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि इतर यांचे आर्थिक हितसंबंध, हरकती असल्यास योग्य त्या कागदपत्रांसह ३ ऑगस्टपूर्वी लेखी स्वरूपात नोंदवाव्यात. ५ ऑगस्ट रोजी दुपारी बारा ते तीन या वेळेत करआकारणी आणि करसंकलन विभागाच्या कार्यालयात ही लिलाव प्रक्रिया होणार असल्याचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

### इथे होणार लिलाव

» महापालिका सहाय्यक आयुक्त (करआकारणी व करसंकलन) यांच्या कार्यालयात (तळमजला, महापालिका मुख्य इमारत, पिंपरी) पाच ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते तीन या वेळेत लिलाव होणार आहे.

महापालिकेचा मिळकतकर वर्षानुवर्षे थकीत असलेल्या मिळकतधारकांना गेल्या वर्षी नोटीस बजावल्या होत्या. तरीही प्रतिसाद न दिल्याने मिळकती जप्त केल्या. त्यांचा आता लिलाव केला जाणार आहे. ५० हजारांपासून तीन लाख रुपयांपर्यंत मिळकतकर थकबाकी असलेल्या या मिळकती आहेत. त्यांचे बाजारमूल्य किमान १९ लाखांपासून दीड कोटी रुपयांपर्यंत आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' मधील प्रकरण आठ (कराधान नियम) नियम ४२ ते ४८ मधील तरतुदींनुसार मालमत्तांची जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी महापालिकेच्या करसंकलन विभाग, मुख्य कार्यालयात दोन ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत आधारकार्ड, पॅन कार्ड यांच्या प्रतींसह लेखी अर्जाद्वारे नोंदणी करायची आहे. तसेच, लिलावातील मालमत्तांबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था व इतर यांचे आर्थिक हितसंबंध, हरकती असल्यास योग्य त्या कागदपत्रांसह तीन ऑगस्टपूर्वी लेखी स्वरूपात नोंदवायचे आहेत.

मिळकतकर थकबाकी असलेल्या ८८ मिळकती पिंपरी-चिंचवड महापालिकेने जप्त केल्या आहेत. त्यांचा लिलाव पाच ऑगस्ट रोजी होणार आहे. यामध्ये प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकांसह व्यापारी व व्यावसायिकांच्या मालमत्तांचा समावेश आहे.

# ग्रामीण भागातील अल्पवयीन वाहन चालक सुसाट...

## दिवसेंदिवस अशा अल्पवयीन वाहन चालकांची संख्या वाढत चालली असून त्यावर आळा घालणे गरजेचे

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील ग्रामीण भागात नाणे मावळ, पवन मावळ, आंदर मावळ तसेच अनेक शहरी ठिकाणी अल्पवयीन वाहन चालक सुसाटपणे वाहने चालवताना दिसतात.

दिवसेंदिवस अशा अल्पवयीन वाहन चालकांची संख्या वाढत चालली असून त्यावर आळा घालणे गरजेचे आहे. पालकांची बेफिकीरी, शाळा व्यवस्थापनाचे दुर्लक्ष आणि पोलिस प्रशासनाची जरब नसणे यामुळे अल्पवयीन वाहनचालक बेदकारपणे वाहने चालवत असून यातून अपघाताचा धोका संभवतो.

तालुक्यात ग्रामीण आणि शहरी भागात दोन्हीकडे अल्पवयीन मुले-



### शाळांमध्ये विद्यार्थ्यांना याबाबत प्रबोधनाची गरज

» अतिलाडावलेली ही मुले शालेय परिसरात वाहने चालवितात, बाजारभागात कर्णकर्कश हॉर्न वाजवत सुसाट वाहने चालवितात. बाजारपेठ, सार्वजनिक ठिकाण, शाळा, महाविद्यालय परिसर यासह आदी ठिकाणी नेहमीच अल्पवयीन मुले घरातून दुचाकी, चारचाकी घेऊन सर्रासपणे दिवसरात्र बाहेर पडतात त्यामुळे आता खरेतर शाळा व्यवस्थापन आणि पोलिस प्रशासन यांनी याविरोधात कारवाई सुरू केली पाहिजे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे याबाबत प्रबोधन होणे गरजेचे आहे. तर पोलिस प्रशासनाने विशेष मोहिम काढून अशा अल्पवयीन वाहन चालकांच्या अर्थात त्यांच्या पालकांवर कारवाई केली, तर हे प्रमाण नक्कीच कमी होईल.

### पालक सर्वाधिक जबाबदार

» पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणातून जागरूक न होता तालुक्यातील पालक आपल्या अल्पवयीन मुलांच्या हातात वाहनांची चावी सुपूर्द करतात, ही खरे तर शोकांतिका आहे. आपल्याकडे वाहन चालविण्यासाठीचा परवाना अर्थात ड्रायव्हिंग लायसन्स हे अठरा वर्षे पूर्ण झाल्याशिवाय आणि वाहन चालवायचा कोर्स पूर्ण केल्याशिवाय मिळत नाही.त्यामुळे वाहन चालवण्याचा परवाना नसताना मुलांनी वाहन चालविले आणि काही दुर्घटना घडली, तर पालकांनाच दोषी धरले जाते. त्यामुळे खरे तर पालकांनी जागरूक होणे आवश्यक आहे.

मुली दुचाकीवर ट्रीपल सीट जातानाचे चित्र सर्रासपणे दिसते. कोणतेही प्रशिक्षण आणि मार्गदर्शन नसल्याने बेजबाबदारपणे आणि बेदकारपणे हे अल्पवयीन वाहने चालवतात. आपण शंभरच्या स्पीडने किंवा त्यापेक्षा अधिक जोरात गाडी चालवली याची खमंग चर्चाही करतात. वाहन चालविताना हॉर्नचा कर्कश आवाज करत, वाहनांची फायरिंग वाढवत प्रदूषण वाढवितात. यामुळे रस्त्यावरील पादचारी, व्यावसायिक यांना शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

# महिलांसाठी 165 जागा ‘हॉटस्पॉट’!

## धोकादायक, असुरक्षित ठिकाणी सुरक्षा वाढवण्याचे, प्रतिबंधात्मक उपाय योजण्याचे पोलिसांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील थोडीथोडकी नव्हे तर तब्बल १६५ ठिकाणे महिलांसाठी असुरक्षित असल्याची माहिती समोर आली आहे. पुणे पोलिसांनी महिला सुरक्षेच्या अनुषंगाने संवेदनशील असलेले हे ‘हॉटस्पॉट’ शोधून काढले आहेत. यामध्ये सर्वाधिक संवेदनशील ‘हॉटस्पॉट’ हे अनुक्रमे शिवाजीनगर, पर्वती, बिबवेवाडी, हडपसर आणि येरवडा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत आहेत. यासोबतच शहरातील पाचही परिमंडळांमध्ये सर्वाधिक ‘हॉटस्पॉट’ अनुक्रमे परिमंडळ चार, पाच आणि एकच्या हद्दीत आढळून आले आहेत. शासनाच्या निर्णयानुसार पुण्यामध्ये २०१५ साली पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या ‘महिला सुरक्षा समिती’च्या वतीने या ठिकाणी उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने कारवाई सुरू केली आहे.

राज्य शासनाने महिलांच्या सुरक्षा संदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यासाठी सर्व पोलीस दलांना २०१५ साली महिला सुरक्षा समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. शासनाच्या आदेशानुसार तत्कालीन पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली २०१५ साली 'महिला सुरक्षा समिती' स्थापन करण्यात आली होती. त्यानंतर काही काळ ही समिती 'डी ॲक्टिव्हेट' असल्याचे समोर आले होते. ‘ सीविक मिरर’ने याबाबत सविस्तर बातमी प्रसिद्ध केली होती. महिला आणि मुलींच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या ठिकाणांची यादी तयार करून या ठिकाणांवर आवश्यक त्या उपाययोजना करण्याची महत्त्वाची जबाबदारी समितीवर असते. ही समिती स्थापन झाल्यानंतर पोलीस आयुक्तालयामध्ये या संदर्भात दर महिन्याला बैठकादेखील होत होत्या. परंतु, त्यामध्ये काही काळ खंड पडलेला होता. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पुण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर या समितीच्या कामाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. या समितीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली असून पोलीस आयुक्तांकडून या विषयी बैठका घेऊन आवश्यक सूचना केल्या जात आहेत.

या ठिकाणी रात्रीच्या वेळी आवश्यक विजेची उपलब्धता, सुरक्षारक्षक आहेत की नाही, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत की नाही, निर्जन स्थळांवर, गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची गस्त असते का? महिलांना सुरक्षित वाटते का, हे पाहून त्यावर कार्यवाही करण्याचे आदेश वेळोवेळी संबंधित विभागांना देण्यात येतात. शहरातील कोणत्या जागा महिलांसाठी सुरक्षित नाहीत, त्यांचीही पाहणी या उपक्रमाअंतर्गत करून योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या जातात. या समितीमध्ये सर्व विभागांचे अधिकारी असल्याने आपापल्या यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक उपाययोजना लवकरात लवकर केल्या जाव्यात असा त्यामागील हेतू आहे.



### महिलांच्या सुरक्षेची नियमित पाहणी

» पोलीस अधिकाऱ्यांसोबतच पुणे महापालिकेचे अधिकारी, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी नागरी सेवा सुविधा पुरवणाऱ्या खात्यातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरात महिला मार्शल नेमले आहेत. पोलिसांचे दामिनी पथकही पोलीस ठाणे स्तरावर काम करीत आहे. गुन्हे शाखेच्या भरोसा सेल मार्फतही दामिनी काम करीत आहेत. शासनाच्या आदेशानुसार स्थापन झालेल्या या समितीमार्फत शहरातील भुयारी मार्ग, उड्डाणपूल, निर्जन स्थळे, बागा, महाविद्यालयांचे परिसर, शाळांचे परिसर, कामाची ठिकाणे, बस व रेल्वे स्थानके, मेट्रो स्थानके, जीम आदी ठिकाणी असणाऱ्या सुरक्षेची नियमित पाहणी आणि त्यावर लक्ष ठेवण्याचे काम केले जाते.

> माझ्या अध्यक्षतेखाली असलेल्या महिला सुरक्षा समितीच्या नियमित बैठका घेतल्या जातात. महिला सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. प्रत्येक पोलीस ठाण्याकडून त्यांच्या हद्दीतील संवेदनशील ठिकाणांची यादी करण्यात आलेली आहे. या ठिकाणांवर महिला पोलीस मार्शल आणि दामिनी पथकाकडून सातत्याने गस्त घालण्यात येते. महिला सुरक्षेबाबत पोलीस गंभीर असून योग्य त्या उपाययोजना सुरू आहेत. नदीकिनारे, शाळा, महाविद्यालये, निर्जन ठिकाणीही गस्त घातली जात आहे. अनेकदा स्थानिक पोलिसांच्या मदतीने रोडरोमियो आणि मवाल्यांवर कारवाई केली जात आहे.
>
> **- अमितेश कुमार, पोलीस आयुक्त**

# अंगणवाडीतील चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ

## देशमुखवाडी येथील अंगणवाडीतील मुलांना शालेय पोषण आहार सामग्री मुदत संपलेला पोषण आहार वाटप

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात देशमुखवाडी येथील अंगणवाडीतील मुलांना शालेय पोषण आहार सामग्री मुदत संपलेला पोषण आहार वाटप केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. 5) रोजी उघडकीस आली.

खेड पंचायत समितीच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्गत तालुक्यात जवळपास पाचशेच्या वर अंगणवाड्या असून अंगणवाडीतील चिमुकल्या मुलांना पोषण आहार दोन महिन्यांनी दिला जातो.

देशमुखवाडी येथील अंगणवाडीतून कातकरी समाजातील मुलाच्या पालकांना देण्यात आलेल्या पोषण आहार सामग्रीची मुदत (एक्सपायरी) संपलेली असल्याची धक्कादायक घटना समोर आल्याने एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयाचा कारभार किती भोंगळ सुरू आहे, यामुळे स्पष्ट होत आहे. या चिमुकल्या मुलांच्या पालकांना चनाडाळ, मुगडाळ, हळद पावडर व अन्य वस्तू या मुदत संपलेल्या दिल्या आहेत.

खेड पंचायत समितीत एका मुलाचे वडील यांनी देण्यात आलेला पोषण आहाराच्या पॅकिंगमधील वस्तू घेऊन आले होते. त्यांच्या समवेत देशमुखवाडी गावचे माजी सरपंच संदीप देशमुख होते; मात्र अनेक मुदत संपलेल्या पोषण आहार मिळत असून सुध्दा का आवाज उठवत नाही, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. आहार द्यायचा तर चांगला द्या नाहीतर आमच्या बालकांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार असे कुणीही करू नये असा संतप्त सवाल पालकांनी उपस्थित केला.

गेल्या सहा महिन्यांपासून माझ्या मुलाला पोषण आहार दिला जात नव्हता. याबाबत संबंधित अंगणवाडी शिक्षिकेला विचारणा केली तेव्हा त्यांनी तुमचे आधार कार्ड नाही म्हणून तुम्हाला शासनाकडून तुमचा पोषण आहार येत नाही. आता आधार कार्ड अंगणवाडी दिलं तर त्यांनी मुदत संपलेली सामग्री दिली.




### मुदत संपलेला पोषण आहार

» गहू – पॅंकिंग दिनांक – ऑगस्ट 2023
पॅंकिंग केल्यापासून तीन महिने चांगला राहतो

» हळद – पॅंकिंग दिनांक – ऑगस्ट 2023
पॅंकिंग केल्यापासून आठ महिने चांगला राहतो

» चणा – पॅंकिंग दिनांक नोव्हेंबर 2023
पॅंकिंग केल्यापासून चार महिने चांगला राहतो